# बृहन्मुंबई महानगरपालिका

सहाय्यक आयुक्त, डी विभाग यांचे कार्यालय, बृहन्मुंबईमहानगरपालिका डी विभाग कार्यालय इमारत,
दुसरा मजला, जोबनपुत्र आवार, नाना चौक, ग्रँट रोड (प), मुंबई ४०००००७.

क्र.कासआडी/२२३७/सहा.अभि.(परि.)/पूर्व.   दिनांक-३१/०७/२०२६.

## स्थळदरपत्रिका सूचना

उपरोक्त विषयास अनुसरुन दरवर्षी डी विभागातील प्रभाग क्र.२१७ मधील ऑगस्ट क्रांती मार्ग स्थित ऑगस्ट क्रांती मैदान येथे ०९ ऑगस्ट रोजी ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधुन ऑगस्ट क्रांती मार्ग येथील स्मारकाची सजावट व इतर व्यवस्था करण्यात येते. सदर कार्यक्रमाकरिता स्मारकाला फुलांची सजावट करणे व येणा-या मान्यवर लोकांसाठी बसण्याची व्यवस्था करणे अत्यंत गरजेचे व कार्यक्रमाच्या अनुषंगाने इतर तत्सम व्यवस्था करण्यात येते. GeM पोर्टलवर सदर सेवा उपलब्ध नसल्याने विषयांकित कामाकरिता खुल्या बाजार भावाच्या दरानुसार आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांजकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर तसेच 'डी' विभाग कार्यालयातील सुचना फलकावर एकदिवसीय स्थळदरपत्रिका सूचना प्रदर्शित करुन लघुत्तम बजेटरी ऑफरच्या आधारे सिलबंद स्थळ दरपत्रिका (Spot Quotation) मागविण्याचे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशील |
|---|---|
| १. | डी विभागातील प्रभाग क्र.२१७ मधील ऑगस्ट क्रांती मार्ग स्थित ऑगस्ट क्रांती मैदान येथे दिनांक-०९/०८/२०२६ रोजी भारत स्वतंत्र्य लढ्याची साक्ष म्हणून ऑगस्ट क्रांती दिन या कार्यक्रमाचे औचित्य साधुन ऑगस्ट क्रांती मार्ग येथील स्मारकाची सजावट व इतर व्यवस्था करणेबाबत.<br>१)४० फूट उंच स्तंभास परांची बांधुन साफसफाई करणे व स्तंभास रंगरंगोटी करुन सजावट करणे.<br>२)४० फूट उंच स्तंभाच्या चौथ-याची डागडूजी / दुरूस्ती करणे.<br>३)स्तंभाच्या चौथ-यास फूलांची सजावट करणे तसेच, १० पुष्पचक्रांचा पुरवठा व १० किलो फुलांच्या पाकळ्या व २ किलो गोंड्याची फूले यांचा पुरवठा करणे.<br>४)स्तंभासमोरील जाणा-या पायवाटेवर लाल कारपेट टाकणे (२०० फूट लांब X २० रुंद)<br>५) स्तंभाच्या सभोवतालील परिसराची सजावट रंगरंगोटी करणे. |

देय दिनांक-०४/०८/२०२६ व वेळ दुपारी १२:०० वाजेपर्यंत.

सहाय्यक अभियंता (परि./पूर्व.) डी विभाग यांच्या कार्यालयात उपरोक्त दिवशी नियत वेळेपर्यंत सिलबंद दरपत्रिका जमा करण्याचे आव्हाहन करण्यात येत आहे.

सही/-

सहा. अभियंता (परि./पूर्व) डी विभाग